## – भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.४४/२०१९ मधील नि.क्र.४८ वरील आदेश –

(घोषित दि. ०८/१२/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज क्लेमंट क्र.१६ कै. अनिता अनंत तोरसकर यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार क्लेमंट क्र.१६ हे मयत झाल्याची माहिती त्यांना मिळाली. त्याप्रमाणे त्यांनी पुरसीस व क्लेमंट क्र.१६ यांचा मृत्युचा दाखला दाखल केलेला आहे. परंतु, सदर प्रकरणामध्ये अनवधनाने क्लेमंट क्र.१६ चे वारस रेकॉर्डवर घेणेस सुमारे ३ वर्षे ११ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणीवपुर्वक केलेला नाही. तरी क्लेमंट क्र.१६ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. रेफरी यांचे विद्वान जिल्हा सरकारी वकिलांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले. त्यांच्या म्हणणेनुसार प्रस्तुतचा अर्ज खोटा असून रेफरी यांना मान्य नाही. वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब कालावधी प्रदीर्घ असून दिलेले कारण संयुक्तिक नाही. सबब, अर्ज फेटाळणेत यावा.

४. रेफरी यांचे विद्वान जिल्हा सरकारी वकिल व क्लेमंट यांचे विद्वान वकील यांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. क्लेमंट क्र.१६ हे दि. ०२/०८/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसते. प्रस्तुतचा अर्ज दि.०१/११/२०२५ रोजी दाखल करणेत आलेला आहे. रेफरी यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे. परंतु,

प्रस्तुत कामी मूळ भूसंपादन निर्देशन अर्ज हा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ चे चौपदरीकरण कामी झालेल्या निवाडयाच्या अनुषंगाने दाखल करणेत आलेला आहे. अर्ज फेटाळल्यास मयत क्लेमंट क्र.१६ चे वारस हे शासनाकडून मिळणा–या मोबदल्यापासून वंचित राहणार आहेत. तसेच त्यांना भूसंपादन बाबतचा शासनाकडून मोबदला मिळणे स्वाभाविकच आहे आणि तसे न झाल्यास त्यांचा नैसर्गिक न्यायहक्क बाधीत होणार आहे. त्यामुळे क्लेमंट क्र.१६ चे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. मयत क्लेमंट क्र.१६ कै. अनिता अनंत तोरसकर यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by DESHMUKH VIDYA SHARADRAO
Date: 2025.12.09 16:07:11 +0530

दिनांक –०८/१२/२०२५
सिंधुदुर्ग – ओरोस.

(श्रीमती व्ही.एस.देशमुख )
जिल्हा न्यायाधीश–१
सिंधुदुर्ग ओरोस.